# कोंडी

मला नाही वाचता आली
तुझ्या भावनांची भरमसाठ पुस्तके
साधं एक पानही नाही उलटलं मी
आधाराला धरली होती कधीतरी कागदाखाली
आणि लिहिली त्यावर प्रवचनं, भावनांच्या कोंडीवरची.
पुस्तकातली पानं, छान, कोरी करकरीत
जशीच्या तशी, उग्र वासाची
मुखपृष्ठावर माझा चेहरा, हसरा
तुला स्फूर्ती देणारा, समजून घेणारा, सदैव
कृतज्ञता व्यक्त करणारे तुझे शब्द
पुस्तकातून बाहेर डोकावणारे
माझा अहम सुखावणारे,
माझ्या सुवचनात, प्रवचनात
तुझा नामोल्लेखही नाही.
तुझ्या भावनांच्या पायऱ्यांनी
मला वाट दाखवली होती खरंतर.
पण मी चाललोच नाही
भरारी घेतली आणि आकाशातून तुला बघितलं, बरेच वेळा
तुच्छतेने!
आपण कधीच भेटणार नाही आता
कारण तुला पंख नाहीत आणि मला पाय नाहीत
तुझ्या पुस्तकांना लागेल वाळवी माझ्या कपाटात,
आणि तू समजत असशील की मी उराशी बाळगून बसलोय
आकाशात उडत आली तुझ्या पुस्तकांची पानं, पतंग होऊन
पुन्हा तोच वास पण आता त्याच्या पंखावर माझीच चित्रं !!
माझ्या अवतीभवती घिरट्या घालताहेत
फडफडणाऱ्या पानातून मीच हेलापटतोय!
माझं पुस्तकी रूप.
ओघळून जातोय आविर्भाव माझा
पंख अकाली थकलेत पण आता पाय नसल्याने
मी वाट शोधतोय मऊ ओलसर भावनांची
जिथे मी हलकेच पडेन, विदीर्ण !!

मला ही नाही लागणार आणि कळणार नाही
कोणालाच, माझ्या भावनांची कोंडी !!

**- संध्या रानडे**